**<u>ठळक बातम्या</u>**

- भर्ती प्रक्रियेच्या तत्त्वात मूलभूत बदल करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त
- दुष्काळी भागातल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत द्यायचा सरकारचा प्रयत्न, दुष्काळ जाहीर न झालेल्या १९ तालुक्यांमध्येही सर्वेक्षण होणार
- रायगड जिल्ह्यात दिवेआगार इथं समुद्रात बुडून ८ जणांचा मृत्यू
- विमान अपहरणाचा प्रयत्न हाणून पाडणाऱ्या वैमानिक स्मित मच्छार यांच्यावर कौतुकाचा वर्षाव

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंना आज २ रौप्य आणि ३ कांस्य पदकं

**<><><><><>**

भरती प्रक्रियेच्या तत्वात मूलभूत बदल घडवण्याची गरज असून, निवड प्रक्रिया ही केवळ उमेदवाराची शैक्षणिक पात्रता नव्हे, तर सार्वजनिक सेवेत येण्यामागची त्याची प्रेरणा जाणून घेणारी असावी, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या शताब्दी सोहळ्याला संबोधित करत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री बाइट**

आपल्याला एखादी सेवा मिळेल यासाठी आजचा नागरिक दीर्घकाळ प्रतीक्षा करू शकत नाही. नागरिकांच्या, विशेषतः युवा पिढीच्या अपेक्षा खूप मोठ्या असून, परिवर्तनाची ही चिन्हं ठळकपणे दिसून येत आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ सेवा वितरणापुरता मर्यादित नसून, सार्वजनिक सेवा, या आजच्या त्वरित सेवा देणाऱ्या

जगाच्या वेगाशी जुळवून घेत आहेत का, आणि तेवढ्याच वेगाने पुढे जाऊ शकतील का, हा असल्याचं ते यावेळी म्हणाले.

प्रशासकीय फेररचनेची गरज त्यांनी अधोरेखित केली. परीक्षा घेणाऱ्या संस्थांनी गुणवत्तेशी तडजोड न करता परीक्षा प्रक्रिया जलद करण्यासाठी निश्चित कालमर्यादेचं तत्त्व स्वीकारावं आणि देशाच्या व्यापक सुधारणा प्रक्रियेशी वेगाने जुळवून घ्यावं, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><>

दुष्काळग्रस्त भागात पिकांच्या नुकसानीचे पंचनामे लवकर पूर्ण करण्याचा, आणि दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असं महसूल मंत्री, आणि दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. ते मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. राज्यातल्या दुष्काळी परिस्थितीत ‘ट्रिगर-वन’मध्ये न आलेल्या, मात्र प्रत्यक्षात दुष्काळाची स्थिती असलेल्या, सुमारे १५ ते १८ तालुक्यांनाही अचूक पंचनामे आणि आणेवारीच्या आधारे दुष्काळाच्या कक्षेत आणून न्याय दिला जाईल, असं ते म्हणाले.

<><><><>

दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांमधल्या शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचं पुनर्गठन करायचा, तसंच शेतीशी निगडीत कर्जांच्या वसुलीला स्थगिती द्यायचा आदेश सहकार विभागानं जारी केला आहे. कर्जाची परतफेड करू न शकणाऱ्या शेतकऱ्यांचं यंदाच्या खरीप हंगामातलं पीक कर्ज पुनर्गठित करावं, ही कार्यवाही ३० एप्रिल २०२७ पर्यंत पूर्ण करावी असे आदेश सहकार विभागानं दिले आहेत.

<><><><>

दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांशिवाय आणखी १९ तालुक्यांमध्ये सर्वेक्षण करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. नांदेडमधले मुदखेड, मुखेड, अर्धापूर,

चंद्रपूरमधले जिवती, ब्रह्मपुरी, बल्लारपूर

गोंदियातले आमगाव, देवरी, सालेकसा आणि गोंदिया

नाशिकमधले त्र्यंबकेश्वर, चांदवड, निफाड

भंडाऱ्यातले मोहाडी आणि तुमसर

सांगलीतला शिराळा आणि वाळवा

याशिवाय वर्धा जिल्ह्यातला कारंजा आणि सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यात हे सर्वेक्षण होणार आहे. या तालुक्यातल्या प्रमुख पाच पिकांचं २० टक्के सर्वेक्षण, ग्राउंड ट्रूथिंग करून अधिकाऱ्यांनी तातडीने अहवाल सादर करावेत, अशा सूचना मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत देण्यात आल्या.

<><><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्याअंतर्गत राज्यातल्या ३ लाख २७ हजार २५० पात्र शेतकऱ्यांना तिसऱ्या टप्प्यातला ३ हजार १६० कोटी रुपयांचा हप्ता राज्य सरकारनं आज वितरीत केला. आतापर्यंत या कर्जमुक्ती योजनेअंतर्गत १५ लाख ८५ हजार ४९३ पात्र शेतकऱ्यांना १३ हजार २७५ कोटींचं वितरण करण्यात आलं आहे.

<><><><>

रायगड जिल्ह्यातल्या दिवेआगरच्या समुद्रात ८ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. त्या सगळ्यांचे मृतदेह हाती लागल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पुण्यातल्या आळंदी इथल्या एका खासगी शिकवणी वर्गाच्या ११वी आणि १२वीच्या एकंदर ४२ विद्यार्थ्यांची सहल इथं आली होती. यातले काही विद्यार्थी पोहायला समुद्रावर गेले होते, त्यातले ८ जण बुडाले.

<><><><>

१८० जणांना घेऊन जाणाऱ्या विमानाचा अपघात करायचा सहवैमानिकाचा प्रयत्न हाणून पाडणारे वैमानिक स्मित मच्छार यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतोय.

स्मित हे खरे हीरो असल्याचे गौरवोद्गार इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी काढले. इस्राइल सरकार त्यांचा विशेष सन्मान करण्याच्या विचारात आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही त्यांना हीरो असं म्हटलं आहे. संयुक्त अरब अमिरातीतले भारताचे राजदूत दीपक मित्तल यांनी आज वैमानिक वैमानिक स्मित मच्छार यांची भेट घेतली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही वैमानिक स्मित मच्छार यांचं कौतुक केलं. स्वतः गंभीर जखमी असतानाही त्यांनी इतरांचा जीव वाचवला, असे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात काढले. वैमानिक स्मित यांच्यामुळे वर्ल्ड ट्रेड सेंटरवरच्या हल्ल्यासारखा मोठा हल्ला टळला. १४० कोटी भारतीय त्यांना सलाम करत आहेत आणि त्यांची प्रकृती लवकर बरी व्हावी यासाठी प्रार्थना करत आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र वैमानिक स्मित यांचा सर्व भारतीयांना सार्थ अभिमान आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी काढले. त्यांनी आज वैमानिक स्मित यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. गुजरात सरकार त्यांना वैमानिक स्मित यांना पुरस्कारानं गौरवणार आहे.

वैमानिक स्मित यांच्या मुंबईतल्या घराबाहेर हातात तिरंगा ध्वज घेतलेल्या प्रशंसकांची मोठी गर्दी दिसून आली.

**<><><><><>**

आगामी दिवाळीच्या काळात फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याची शक्यता सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली असून, याबाबत समतोल दृष्टिकोन स्वीकारला आहे. दिवाळीच्या सणाला विशिष्ट प्रकारच्या फटाक्यांच्या वापराला परवानगी दिली जाईल, मात्र, त्यासाठी वेळेचे निर्बंध घातले जातील, असं न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या पिठानं यावेळी सांगितलं.

राजधानी दिल्ली आणि उत्तरेकडच्या इतर राज्यांमध्ये वायुप्रदूषणाच्या काळात फटाक्यांवर बंदी घालण्यात आली होती. त्याबाबतच्या एका याचिकेवर सुनावणी दरम्यान न्यायालयानं हा निर्णय दिला.

**<><><><>**

सणासुदीच्या काळात वाजवी दरात साखरेचा पुरेसा पुरवठा व्हावा यासाठी सरकारने आज साखर विक्रेत्यांसाठी साठा ठेवण्याची कमाल मर्यादा १ हजार क्विंटल पर्यंत कमी केली. हा निर्णय १५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीसाठी लागू असेल. विक्रेत्यांना फक्त १५ दिवसांचा साठा करण्याची परवानगी असेल.

**<><><><>**

केंद्र सरकारनं पात्र दिव्यांग लाभार्थ्यांसाठी सवलतप्राप्त फास्टॅगचा वैधता कालावधी १ वर्षावरुन ५ वर्षांपर्यंत वाढवला आहे. हे फास्टॅग जारी करणं आणि त्यांच्या नूतनीकरणाबाबतच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये केंद्र सरकारनं सुधारणा केली आहे. या मार्गदर्शक सूचनांनुसार, ७० ते १०० टक्के दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना १ ऐवजी पाच वर्षांनी, तर इतर दिव्यांगाना ३ वर्षांनी नुतनीकरण करावं लागेल.

**<><><><>**

आशियाई क्रीडा स्पर्धांच्या १२व्या दिवशी भारतीय खेळाडूंनी 2 रौप्य आणि 2 कांस्य पदक पटकावली. भारताच्या पदकांची एकूण संख्या ६४ वर पोहोचली असून त्यात १० सुवर्ण, २२ रौप्य आणि ३२ कांस्यपदकांचा समावेश आहे. भारत पदकतालिकेत ८व्या स्थानावर आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

कुस्तीपटू नितेश सिवाच यानं आज पुरुषांच्या ९७ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावलं. अंतिम सामन्यात नितेशचा जपानच्या युरी नकाझातोकडून ०-४ असा पराभव झाल्यानं त्याचं सुवर्णपदक हुकलं. भारतानं आज नौकानयन प्रकारात पहिलं पदक पटकावलं. मनु फ्रान्सिस आणि प्रिन्स कुरिसिंकल नोबल या जोडीनं पुरुषांच्या स्किफ प्रकारात रौप्यपदक मिळवलं. तिरंदाजीत पुरुष गटाच्या कपांउंड प्रकारात गणेश मणिरत्नम तिरुमुरू याने कांस्यपदक पटकावलं. स्क्वाश क्रीडा प्रकारात भारताच्या पुरुष आणि महिला, दोन्ही संघांना कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं. उपांत्य फेरीत पुरुष संघाला मलेशियानं तर महिला संघाला हॉन्गकॉन्गनं पराभूत केलं. स्क्वॉशमध्ये महिलांच्या सांघिक उपांत्य फेरीत भारताला हाँगकाँगकडून १-२ असा पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे भारताला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं. पुरुष हॉकीच्या उपांत्य फेरीत भारतानं पाकिस्तानचा ४-३ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. तर, भारतीय महिला हॉकी संघानं चीनविरुद्ध होणाऱ्या अंतिम सामन्यात आधीच आपलं स्थान निश्चित केलं आहे.

**<><><><><>**

यंदाच्या मोसमात हिमाचल प्रदेशात सफरचंदाच्या उत्पादनात ४८ टक्के घट होण्याचा अंदाज आहे. वातावरण बदल, अवकाळी पाऊस, वादळी वारे, बर्फवृष्टी यामुळं पीकांचं नुकसान झाल्याचा अंदाज आहे. गेल्यावर्षीच्या सप्टेंबरपर्यंत २ कोटी १८ लाखांहून अधिक खोके बाजारात आले होते. यंदा हे प्रमाण १ कोटी १५ लाख खोक्यांपेक्षा कमी असल्याचं राज्याचे फलोत्पादन संचालक सतीश कुमार म्हणाले.

**//<><><><><>//**